## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ३०/०१/२०१८

**१) जातीवाचक शिवीगाळ करुन धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २८/०१/२०१८ चे १९.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी हा अनुसुचित जाती व जमातीचा असुन सुध्दा यातील आरोपीने फिर्यादीस पाहुण तुने व तुझ्या ग्रा. पं. च्या बाडीच्या लोकांमुळे आमचे नाव पुणवर्सन गावाचे यादीत आले नाही. या कारणा वरुन त्यास जातीवाचक शिवीगाळ देवुन त्याचा पानउतारा करुन गुन्हयात अडविण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ५०६ भादंवि. सहकलम ३(१)(द) अ.जा.ज.अ.प्र.कायदा १९८९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी पवनी श्री. टिक्कस हे करीत आहेत.

**२) महिलेच्या खात्यातुन पैश्याची अफरातफर केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १२/०३/२०१६ चे ९.००ते १७.०० वाजता. दरम्यान यातील आरोपीने उपडाकपाल मोहाडी या पदावर प्रभारी कार्यभार असतांना १ वर्षाची सावधी जमा खाते धारक महिलेच्या खात्यातुन ५०,०००/–रु. जमा न करता परस्पर स्वत:करीता वापरुन अफरातफर केल्याने फिर्यादी अमोल शामराव भगत वय ३६ वर्ष, रा. तुमसर यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ४०९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गेडाम पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**३) अल्पवयीन मुलाला फुस लावुन पळवुन नेल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २९/०१/२०१८ चे ८.०० ते १५.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादीचा अल्पवयीन मुलगा हा शाळेमध्ये जातो म्हणुन शाळेत गेला परत आला नाही. त्याचा शोध घेतला असता मिळुन आला नाही, त्याला कोणीतरी अज्ञात ईसमाने फुस लावुन पळवुन नेले असावे असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३६३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. शहारे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**४) ईलेक्ट्रीक दुकानातील सामानाची चोरी . :–**

दिनांक २८/०१/२०१८ चे १९.३० ते २९/०१/२०१८ चे १०.३० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी मनिराम जानुजी नागपुरे वय ६४ वर्ष, रा. पाथरी यांचे ईलेक्ट्रीक दुकानाचे मागील दाराचा कोणीतरी अज्ञात चोराने कोंडा तोडुन आत प्रवेश करुन दुकानात ठेवलेले जुने एमप्लीफायर ३५० व्हॅट १ नग, जुना एमप्लीफायर २५० व्हॅट, १ नग, माईक १०० व्हॅट १ नग, चायनल वायर ३०० फुट, मेमोरी प्लेयर २ नग, ऑटो वायर २.५ एमएम २७० फुट, ऑटो वायर २.५ एमएम २७० फुट, ऑटो वायर १.५ एमएम ५ नग, फॅट्री वायर १६/४० नग ५ पॉकेट, एक्सएलआरटीआयएम १० नग, १ एक्सएलआरपीआय एल हलके २५ नग, एक्सपीसीसीओएन १० नग, आरसीपीआयएन २० नग, असा एकुण २८,६५०/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ४५७,३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा.. तांडेकर पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

**५) वैनगंगा नदीचे पाण्यात बुडुन महिलेचा मृत्यु . :–**

दिनांक २९/०१/२०१८ चे ०८.२३ वाजता. दरम्यान यातील मृतक सौ. कल्पना दिलीप सिंधपुरे वय ३८ वर्ष, रा. करडी ही वैनगंगा नदीचे पाण्यात बुडुन मरण पावल्याने फिर्यादी राजेश मुरलीधर बोंन्द्रे वय ३२ वर्ष, रा. सितेपार यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. साबळे पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**६) गळफास लावुन इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक २९/०१/२०१८ चे १९.३० वाजता. दरम्यान यातील मृतक धनराज दिवारु हटनागर वय ३३ वर्ष, रा. लाखनी हा स्वत:चे घरी माचघरात धाब्याचे बासाला दुपटयाने गळफास लावुन मरण पावल्याने फिर्यादी राहुल रमेश हटनागर वय ३३ वर्ष, रा. लाखनी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. ऊईके पो.स्टे लाखनी हे करीत आहेत.

**७) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २९/०१/२०१८ चे १७.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मॅक्स गाडी ही बस स्थानक चौक नाकाडोंगरी येथील येणारे जाणारे लोकांना अडथडा निर्माण होईल व लोकांचे जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभे करुन मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोना. इंगोले यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. इंगोले पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**८) दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चालवितांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक २९/०१/२०१८ चे ११.४० वाजता. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल ही पोस्ट ऑफीस चौक भंडारा येथे दारु पिवुन दारुचे नशेत मिळुन आल्याने, त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशिन व्दारे चेक केले असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. मेश्राम वानिशा.भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५(१) मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास पोना. साबळे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**९) अवैध दारु अड्डयांवर धाडी . :–**

दिनांक २९/०१/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन कारधा व गोबरवाही येथे अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ३० लिटर हातभट्टी दारू+ १२० किलो सडवा+ साहित्य किंमती ११,९५०/–रु, चा माल जप्त करण्यात आला.

**१०) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक २९/०१/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ९४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०१, तीन सिटर वाहनाकरीता ०५, ईतर वाहनांवरती – ८८ केसेस करण्यात आले आहे.


(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५


प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.

प्रेसनोट

## माहात्मा गांधी हुतात्मा दिवस

जा.क्र. ६१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ३०/०१/२०१८

भंडारा:– पोलीस नियंत्रण कक्ष भंडारा येथील प्रांगणात आज दि. ३०/०१/२०१८ रोजी मा. पोलीस अधीक्षक भंडारा विनीता साहू व अपर पोलीस अधीक्षक रश्मि नांदेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधिक्षक(गृह) कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रपिता माहात्मा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन २ मिनिट मौन पाळुन थोर माहात्म्यांना हुतात्मा दिवसा निमीत्त आंदराजली वाहण्यात आली.

यावेळी कार्यक्रमाला पोनी. घुसर स्थागुशा भंडारा, पोनी. गाडे वानीशा भंडारा, पोनी. तेलुरे जिवीशा भंडारा, सपोनी. कदम मानवी संसाधन विभाग भंडारा, मपोउपनी. चाटसे महिला सेल भंडारा, राखीव पोलीस निरीक्षक वर्मा, पोलीस उपनिरीक्षक प्रधान पोलीस मुख्यालय भंडारा, तसेच पोलीस अधिकारी/कर्मचारी व कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.

(एस. व्हीं. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,.

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.